# हळबे महाविद्यालयात शिक्षक दिन उत्साहात

दोडामार्ग, १७ सप्टेंबर (वार्ताहर)- दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात शिक्षक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांनी स्वत: शिक्षक होऊन अध्यापनाचे काम केले. प्राचार्यांची भुमिका भुषण सावंत तर उपप्राचार्य म्हणुन जीवन सावंत यांनी काम बघितले. यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले भाषण विद्यार्थ्यांना स्क्रिनवर दाखविण्यात आले.यावेळी प्राचार्य डॉ.व्हि.ए.पाटील, प्रा.डॉ. एस.यु.दरेकर,प्रा.डॉ. पी.डी.गाथाडे, प्रा.डॉ.आर.एस.इंगळे, प्रा.एस.एन. खडपकर ,प्रा.आर.ए.मोरे ,प्रा.डॉ.एम.टी.बेग, प्रा.एस.एस. पाडगांवकर तसेच कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

# लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालय हिंदी दिन

दोडामार्ग, १७ सप्टेंबर (वार्ताहर)- येथील लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालयात १४ सप्टेंबर हा हिंदी दिवस म्हणुन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलन व सरस्वती पुजनाने करण्यात आली. हिंदी दिनाचे औचित्य साधुन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. यावेळी सचिन सुतार, प्रतिक्षा हरमलकर, मिना कुडचिरकर, सायली गवस, विद्या धर्णे, वंदना पटकारे, भावना रसाळकर, भुषण सावंत, राजेश नाईक आदी विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला.

हिंदी विभाग प्रमुख प्रा.पी.एन.ढेपे यांनी आपल्या प्रास्ताविकात हिंदी दिन साजरा करण्यामागील हेतु कथन केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ.एस.यु.दरेकर होते.यावेळी प्राचार्य डॉ.व्हि.ए.पाटील, प्रा.डॉ. एस.यु.दरेकर,प्रा.डॉ. पी.डी.गाथाडे, प्रा.डॉ.आर.एस.इंगळे, प्रा.एस.एन. खडपकर ,प्रा.आर.ए.मोरे ,प्रा.डॉ.एम.टी.बेग, प्रा.एस.एस. पाडगांवकर तसेच कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भुषण सावंत तर आभार मिना कुडचिरकर हिने मानले.

रत्नागिरी टाइम्स 18/9/14